माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ७८७/२०२१**
**अपिलार्थी, श्री. वसंतराव सदाशिवराव धर्माळे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार**
नगर परिषद कार्यालय आर्वी, ता. आर्वी जि.वर्धा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद कार्यालय आर्वी, ता. आर्वी जि.वर्धा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०१.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २९.१२.२०२० | निरंक | ०९.०२.२०२१ | १७.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २९.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) दि. २३.११.२०२० ला आपल्या कार्यालयात डिसपॅच मध्ये दिलेल्या तक्रारीनुसार आपण केलेल्या चौकशीचा अहवाल टिपणी व अभिप्राय तसेच संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल देण्यात यावा, २) माहिती अधिकारात आपणास दिलेल्या गैरअर्जदाराने नियम व कायदे या संदर्भात सदर जागा व घर हे नियमात आहे काय? त्याचेवर आपण कोणती कारवाई केली त्याची माहिती देण्यात यावी" इ. २ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थी यांनी **दिनांक ०९.०२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “माहिती अधिकार तरतुदीनुसार माहिती न देणे, तरतुदींचा भंग करणे, बेजबाबदार वागणे, कर्तव्यनिष्ठा न पाळणे” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, मुळ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी, नगर रचना विभाग यांनी अपिलकर्ता यांना ७ दिवसाच्या आत विनामुल्य माहिती देण्यात यावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.०२.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यात गैरअर्जदाराला दिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०३.२०२१ रोजी** " प्रथम अपिलीय आदेशानुसार माहिती देण्यात आलेली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०४.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार, श्री. शंतनु राजेंद्र भांडारकर व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्री. मनोजकुमार शहा उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. धर्माळे यांनी दिनांक २९.१२.२०२० रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी, नगर परिषद आर्वी यांनी प्रथम अपिलीय आदेशानुसार अपिलार्थीस मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती प्रदान केलेली आहे. परंतू मिळालेली माहिती ही दिशाभूल करणारी असल्याचा आक्षेप नोंदवित अपिलार्थी यांनी आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणातील माहितीशी संदर्भात अपिलार्थी यांच्या यापूर्वीच्या दिनांक १९.१०.२०२० रोजीच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९.११.२०२० रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यात मुद्दा क्र. १ संदर्भात सदर रस्ता मंजूर अभिन्यासातील असून मंजूर अभिन्यासातील खुल्या जागा, रस्ते व नाली हे नगर परिषदेला हस्तांतरीत केलेले असतात. मुद्दा क्र. २ व ४ संदर्भात सदरची माहिती ही कर विभागाशी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. ३ बाबत सदरच्या मकानाचे नस्तीची माहिती आढळून येत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच माहिती अधिकारी, कर विभाग, नगर परिषद आर्वी यांनी दिनांक ०९.११.२०२० रोजी घराच्या कराची आकारणी संदर्भात असेसमेंटची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे. तसेच मुद्दा क्र. ४ बाबत रेकॉर्डची तपासणी केली असता, परवानगी दिसून आली नाही. त्यामुळे यावर कर आकारणी करण्यात आली नाही, असे अपिलार्थीस कळविले. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अधिकार अर्जातील श्री. रामकिशन विठ्ठलराव हेडाऊ यांच्या घराच्या बांधकामाच्या संबंधित तपशिल, यातील काही भाग भाडयाने दिलेला असल्यास त्या संबंधित मालमत्ता कराची आकारणी संबंधित माहिती तसेच संबंधित तक्रार अर्जावर आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल याचा संपूर्ण अद्ययावत अहवाल व या विषयाशी संबंधित संपूर्ण नस्तीची छायांकित व साक्षांकित प्रत अपिलार्थी यांना तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

माहिती आयोग खंडपीठ नागपूर राज्य माहिती आयोग ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०४.०१.२०२३**

3 JUL 2023

जावक क्रमांक ---4114--- दिनांक ---------------------------